# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

फोन नं. २४०२०७८१/२४०२०४३७
फॅक्स नं. २४०२४०६८

MAHARASHTRA

कल्पतरू पॉइंट, २, ३, व ४ था मजला,
सायन माटुंगा स्किम रोड नं. ८,
सायन, मुंबई – ४०० ०२२.

क्र. मप्रनि/सहसंचालक (जप्रनि)/ब: ७४०२ दिनांक : १२/०४/२०१८.

प्रति,

**मा. प्रधान सचिव,**
नगरविकास विभाग-२,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई.

**विषय :** नदयांच्या सद्यस्थितीचा : प्रदुषित पट्ट्यांचा आढावा घेण्यासंदर्भात व प्लास्टिक बंदी संदर्भात जनजागृती करण्यासाठी दि. २५ एप्रिल, २०१८ रोजीची कार्यशाळा....

महोदय,

केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २००९ ते २०१२ या कालावधीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संकलित केलेल्या महाराष्ट्रातील नदयांच्या पाण्याच्या पृथ्थक्करण अहवालावर आधारीत ४९ प्रदूषित नदयांचे पट्टे मार्च २०१५ मध्ये जाहिर केले. केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने BOD हा एकच घटक विचारात घेतला होता, जेथे BOD ३ mg/l. पेक्षा जास्त आहे. हया नदीच्या प्रदूषित पट्ट्यांवर उपाययोजना करण्यासाठी केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्राथम्यता पातळी पण दिलेली होती.

म. प्र. नि. मंडळात २०१७-१८ मध्ये संकलित केलेल्या माहितीवरून नदीच्या पाण्याची गुणवत्ता लक्षात घेता ४९ पैकी १३ नदयांचे पट्ट्यांमध्ये प्रदूषणाची पातळी कमी झाल्याचे दिसून येते. तसेच १ प्रदूषित पट्टा (मांजरा) वर्षभर कोरडा आढळून आला आहे. म्हणून सद्यस्थितीत उर्वरित ३५ नदयांचे पट्ट्यांमध्ये प्रदूषण कमी झाल्याचे आढळून आले. तसेच महाराष्ट्र शासनामार्फत नमामी चंद्रभागा अभियान राबवून भीमा नदीच्या प्रदूषणावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासंदर्भात म. प्र. नि. मंडळामार्फत नवी दिल्ली येथे कार्यशाळेमध्ये दि. ०८ जानेवारी, २०१८ कार्यशाळेदरम्यान सादरीकरणात मंडळाने केलेल्या कामाचा उहापोह करण्यात आला.

त्यानंतर मंडळाने प्रदूषित पट्ट्यांच्या संदर्भात केलेल्या कामाचे कौतुक करून सदरील कामाची माहिती भारतातील सर्वच प्रदूषण नियंत्रण मंडळांना व समित्यांना होणे गरजेचे असल्याने यासंदर्भात केलेले काम सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी म. प्र. नि. मंडळाने कार्यशाळा आयोजित करून संबंधितांना निमंत्रित करावे, अशी विनंती करण्यात

आली. त्यानुसार म. प्र. नि. मंडळ दि. २५/०४/२०१८ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, मंत्रालय समोर, मुंबई येथे एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करीत आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत, कटक मंडळे यांनी प्रत्येकी दोन प्रतिनिधी कार्यशाळेसाठी पाठवावा. सदरील कार्यशाळा सर्व प्रदूषण नियंत्रण मंडळे व समित्यांसाठी असल्याने ३६ राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रत्येकी २ प्रतिनिधी कार्यशाळेस हजर राहणार आहेत.

तसेच प्लास्टिक मुळे नालेबंद होणे, नदीचे प्रदूषण, पाण्याचे प्रदूषण प्लास्टीकचे विघटन अल्पावधीत न होणे, नागरी घनकचऱ्यामध्ये प्लास्टिकचे वाढते प्रमाण व त्याच्या व्यवस्थापनामध्ये संबंधित निर्माणकर्ते यांना आलेले अपयश व यामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासासंदर्भात महाराष्ट्र शासनाने प्लास्टिक बंदी दि. २३ मार्च, २०१८ रोजी अधिसूचना काढून महाराष्ट्रामध्ये प्लॅस्टिक बंदी लागू करण्यात आलेली आहे. त्यासंदर्भात दुसऱ्या सत्रामध्ये संबंधित अधिसूचनेवर चर्चा व सादरीकरण करण्यात येईल.

तरी आपणास विनंती करण्यात येते की, संबंधितांना उपरोक्त कार्यशाळेसाठी हजर राहण्याचे आदेश दयावेत.

आपला विश्वासू,

(डॉ.पी. अन्बलगन)
सदस्य सचिव

**प्रत माहितीसाठी सादर:**
अध्यक्ष, म. प्र. नि. मंडळ, मुंबई.